10:30pm TYBMM (Sem-V) 75:25
31/03/2015 Journalism
University Sub: 21 Reporting (Marathi) Library



QP Code : 11255

(मराठी रुपांतर)

( $2\frac{1}{2}$ तास) [ एकूण गुण : ७५

सूचना : (१) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
(२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवीतात.

१. खालील परिच्छेदातून २५० शब्दांची बातमी तयार करा. बातमीच्या उलट्या त्रिकोणाचे तसेच बातमीच्या मूलभूत तत्वांचे पालन त्यात करा. १५

कुर्ला भागामध्ये विविध वर्गातील गोरगरीबांसाठी भाभा महापालिका रुग्णालय सेवा देते. यावर्षी अवेळी पावसामुळे शहरात रोगराईचे प्रमाण बेसुमार आहे. त्यामुळे सर्व महापालिका रुग्णालयांमध्ये रुग्णांचे प्रमाणही अधिक आहे. सायरा शेख या महिलेस रविवारी टायफॉईड झाल्यामुळे भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना बरे वाटू लागले होते व लवकरच त्यांना डिस्चार्जही मिळणार होता. सोमवारी सायंकाळी त्यांना एक इंजेक्शन देण्यात आले, असे त्यांचे पती नूर मोहम्मद शेख यांनी सांगितले. सायरा मूळच्या महाबळेश्वरच्या असून त्या कुर्ला येथील कसाईवाड्यात राहतात. त्यांना आदिल (२३) व सान्या (२१) ही दोन मुले आहेत. सायराव्यतिरिक्त अन्य २७ महिलांनाही भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना खूप ताप आला होता.

सायराचे पती नूर मोहम्मद शेख यांनी सांगितले की 'सायरा यांना टायफॉईडमुळे भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते व त्यांना बरे वाटू लागल्याने लवकरच घरी सोडण्यात येणार होते.या सर्वच्या सर्व २८ महिलांना सेफ्ट्रीअॅक्झोन व सेफोटॅक्सीम ही प्रतिजैविके देण्यात आली होती. ही औषधे सर्वसाधारणपणे गंभीर तापावर दिली जातात. परंतु अचानक या सर्व रुग्णांना या इंजेक्शनमुळे उलट्या होऊ लागल्या. नंतर असे उघड झाले की त्यांना दिलेल्या औषधाच्या दुष्परिणामामुळे हे घडले होते. मंगळवारी सकाळी सर्वांना उलट्या होऊ लागल्या. यापैकी ४७ वर्षीय सायरा यांची तब्येत अधिक अत्यवस्थ होती. त्यांना मेडिसीन वॉर्डमधील इतर महिलांप्रमाणेच अॅलर्जीचे परिणाम जाणवू लागल्यावर केईएम रुग्णालयात हलविण्यात आले. त्यांना अंगात जळजळ व अत्यवस्थ वाटू लागले होते. सायरा यांची स्थिती अत्यंत चिंताजनक होती. मंगळवारी रात्री त्यांचा मृत्यू झाला. भाभा रुग्णालयातील स्थिती योग्यपणे हाताळण्यात आली नाही व दोन तास थांबल्यानंतरच सायराला केईएम रुग्णालयात नेता आले, असा आरोप तिच्या कुटुंबियांनी केला आहे.

सायरा यांना केईएम रुग्णालयाच्या वैद्यकीय अतिदक्षता विभागात तातडीने हलवावे लागले. नूर मोहम्मद म्हणाले की, केईएमच्या डॉक्टरांनी आम्हाला सांगितले की सायराची तब्येत चिंताजनक असून तुम्ही तिच्यासाठी प्रार्थना करा. तिला हिरवी उलटी झाली होती व जीभही काळी पडली होती. तिची वाचण्याची शक्यता फारच कमी होती. कुटुंबियांना अजून तिच्या शवविच्छेदनाचा अहवाल मिळालेला नाही व कुर्ला पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदवून घेतलेला आहे.

मुंबई महापालिकेने याप्रकरणी तपासासाठी समिती नेमण्याचे ठरविले आहे, असे महापालिकेच्या वैद्यकीय सेवांचे संचालक डॉ. अविनाश पांडे यांनी सांगितले. अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने इंजेक्शनचे नमुने तपासणीसाठी घेतले असून सध्या सर्व रुग्णालयांमधून या इंजेक्शनचा वापर थांबविण्यात आला आहे. सायरा यांच्या मृत्यूविषयी डॉ. मनिषा दळवी, अधिष्ठाता, केईएम रुग्णालय यांनी सांगितले की, त्यांची तब्येत चिंताजनक होती. आम्ही तिला वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न केला परंतु तिची प्राणज्योत मालवली.मृत्यूच्या कारणाविषयी त्या म्हणाल्या, शवविच्छेदनाचा अहवाल आल्यावरच मृत्यूचे कारण उलगडेल. औषधाच्या परिणामांनी मृत्यू झाला का हे आम्ही आता ठामपणे सांगू शकत नाही. शीव व केईएममध्ये दाखल अलेल्या उर्वरित रुग्णांची तब्येत स्थिर असून त्यांना लवकरच घरी पाठविण्यात येईल.

munotes.in

२. (अ) (१) बातमी म्हणजे काय? बातमी मूल्य म्हणजे काय? ८
(२) शिरोभागाचे प्रकार स्पष्ट करा ७

किंवा

(ब) काहींच्या मते वस्तुनिष्ठता फक्त कागदांवरच असते, वास्तविकतेमध्ये तसे शक्य होत नाही. बातमीदाराच्या मूलभूत मूल्यांची मांडणी करून हे विधान स्पष्ट करा. १५

३. (अ) अतिवृष्टीमुळे मुंबई शहरातील रेल्वे आणि रस्ते वाहतूक प्रभावित झाली आहे. तुम्ही या प्रसंगाचे वार्तांकन करताना वेगवेगळ्या कार्यक्षेत्रांचे (बीट) स्रोत कसे वापराल, ते सांगा आणि त्याद्वारे वेगवेगळ्या कार्यक्षेत्रासाठीचे (बीट) महत्त्व आणि ज्ञान याविषयी चर्चा करा. १५

किंवा

(ब) राजकीय सभांचे वार्तांकन करताना तुम्हाला राजकीय कार्यक्षेत्राच्या ज्ञानाचा तसेच जाहीर सभा/भाषणांच्या वार्तांकनाचा उपयोग करावा लागेल. चर्चा करा. १५

४. (अ) शोध पत्रकारितेच्या क्षेत्रात वॉटरगेट प्रकरण आजही मैलाचा दगड समजले जाते. चर्चा करा. १५

किंवा

(ब) भारतीय वृत्तपत्रातील बातम्यांचा आधार घेऊन शोध पत्रकारिता आणि पित पत्रकारिता यांच्यातील फरक स्पष्ट करा. १५

५. टिपा द्या. (कोणत्याही तीन) १५
(अ) पडताळणी आणि वक्तव्य यांचे महत्त्व
(ब) जे. जे. मृत्यू प्रकरण
(क) हर्षद मेहता घोटाळा
(ड) पत्रकार परिषद
(ई) पाठपुरावात्मक बातमी

---



munotes.in

Scanned by CamScanner